नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १९५ | Issue - 195 | वार सोमवार दि. २ डिसेंबर २०२४ | Blow- Monday Date 2 December 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## सत्तास्थापनेचा तिढा सुटेना

### निकालाला उलटला आठवडा; मंत्रिपदासाठी रस्सीखेच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाला सामोरं जावं लागलं. विधानसभेत मिळालेल्या मोठ्या यशानंतर महायुतीकडून राज्यात सरकार स्थापनेच्या दिशेने पावलं टाकण्यात येत आहेत. पण निकालानंतर आठ दिवस झाले तरीही महायुतीचं सरकार स्थ-ापन होऊ शकलं नाही. सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचाली सुरु आहेत. यातच मुख्यमंत्री पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार? हे देखील स्पष्ट करण्यात आलेलं नाही. त्यामुळे मुख्यमंत्री पदाबाबत सस्पेंस कायम असल्याचं बोललं जात आहे.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीकडे राज्याचं गृहखातं मागितल्याची चर्चा आहे. यातच शिंदे साताऱ्यातील त्यांच्या दरेगावी आहेत. त्यामुळे ते नाराज असल्याचंही बोललं जात आहे. यातच उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाचीही चर्चा असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींबाबत आज काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरेगावातून प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाचीही चर्चा आहे? यावर प्रश्न विचारला असता अजून चर्चा सुरु आहेत, असं म्हणत त्यांनी सूचक भाष्य केलं.

उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंचं नावाची चर्चा आहे? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांना विचारला असता ते म्हणाले, अजून चर्चा सुरु आहेत. तुम्हीच (माध्यमात) चर्चा करत असतात. तुमच्या (माध्यमाच्या) चर्चा जास्त असतात. त्यामुळे तुम्हाला एकच सांगतो की या सर्व चर्चा आहेत. आमची अमित शाह यांच्याबरोबर चर्चा झाली. यानंतर आता आमच्या तिघांमध्ये (एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार) एक बैठक होईल. या बैठकीत आमची साधक बाधक चर्चा होईल, असं एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं.

शिवसेनेला गृहखातं पाहिजे का? असं विचारलं असता यावर शिंदे म्हणाले, या सर्व गोष्टीबाबत चर्चा होईल. चर्चामधून अनेक गोष्टींवर मार्ग निघेल. तसेच अनेक गोष्टी त्यामधून सुटतील. आम्हाला लोकांनी निवडून दिलेलं आहे. त्या लोकांना आम्ही जी आश्वासने दिली आहेत. आमची लोकांशी बांधिलकी आहे. त्यामुळे आम्हाला आणि त्यांना काय मिळणार हे महत्वाचं नसून आम्हाला लोकांसाठी जे काही करता येईल ते आम्ही करत आहोत, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

तुम्ही मुख्यमंत्री व्हावं? अशी जनतेची मागणी असल्याची चर्चा आहेत?, या प्रश्नावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, सहाजिक आहे की जनतेच्या मनात आणि मी कॉमन मॅन म्हणून जे काम केलं. मी म्हणायचो की मुख्यमंत्री नाही तर कॉमन मॅन. मी कॉमन मॅन म्हणून काम केल्यामुळे सहाजिक तशा भावना सर्वसामान्य माणसांच्या आहेत. तसेच मुख्यमंत्री म्हणून माझ्या नेतृत्वात निवडणुका झाल्या. दोन्ही उपमुख्यमंत्री बरोबर होते. तसेच सर्व सहकारी बरोबर होते. त्यामुळे मोठं यश मिळालं. मात्र, यामध्ये कोणताही संभ्रम नको. त्यामुळे मी गेल्या आठवड्यात पत्रकार परिषद घेतली आणि मुख्यमंत्री पदाबाबतचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह घेतील त्याला आमचा पाठिंबा असेल हे स्पष्ट केलं, असंही शिंदे म्हणाले

## आयसीसीच्या चेअरमनपदाची जबाबदारी जय शाह यांनी स्वीकारली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) चेअरमनपद स्वीकारले आहे, ग्रेग बार्कले यांची जागा घेणारे ३५ वर्षीय जय शाह हे आयसीसीच सर्वात तरुण अध्यक्ष बनले आहेत. २०२० मध्ये पहिल्यांदा या पदावर नियुक्त झाल्यानंतर बार्कलेने तिसरी टर्म न घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यांच्यानंतर या पदासाठी जय शहा यांची निवड झाली.

जय शाह आता शरद पवार, एन श्रीनिवासन, शशांक मनोहर आणि जगमोहन दालमिया यांसारख्या भारतीय प्रशासकांच्या यादीत सामील झाले आ-हेत. जय शाहने २००९ मध्ये क्रिकेट प्रशासनातील आपला प्रवास सुरू केला होता. सेंट्रल क्रिकेट बोर्ड, अहमदाबादच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी प्रवास सुरु केला होता, सप्टेंबर २०१३ मध्ये, शाह यांनी गुजरात क्रिकेट असोसिएशन (जीसीए) चे संयुक्त सचिव झाल्यानंतर अहमदाबादमधील प्रतिष्ठित नरेंद्र मोदी स्टेडियमच्या बांधकामात मदत केली. २०१५ मध्ये, ते बीसीसीआयमध्ये वित्त आणि विपणन समितीचे सदस्य म्हणून सामील झाले. आयसीसीने चेअरमनपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर जय शाह यांचे विधानही प्रसिद्ध केले, ज्यात त्यांनी म्हटले की, ते क्रिकेटच्या जागतिक विस्तारावर अधिक लक्ष केंद्रित करणार आहेत.

## हिंदूच्या घटत्या लोकसंख्येवर सरसंघचालक मोहन भागवत यांची चिंता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नागपूर : लोकसंख्या नीतीमध्ये लोकसंख्या वृद्धीदर २.१ पेक्षा कमी होऊ नये असे सांगण्यात आले आहे. शास्त्रही हेच सांगते. त्यामुळे दोन किंवा तीन मुलांपेक्षा कमी मुले झाली तर समाजाचे अस्तित्व टिकणार नाही, असे मत व्यक्त करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी घटत्या लोकसंख्येवर चिंता व्यक्त केली व किमान दोन ते तीन अपत्ये असावे, असा सल्ला दिला.

दक्षिण अंबाझरी मार्गावरील बी.आर.ए. मुंडले शाळेच्या सभागृहात रविवारी कठाळे कुलसंमेलन आयोजित करण्यात आले.

कठाळे परिवाराच्या सामाजिक कार्याला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य **(पान ३ वर...)**

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. बहुमत मिळाल्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी राज्यात सरकार स्थापनेसाठी हालचाली सुरु केल्या आहेत. मात्र, आज आठ दिवस होऊनही राज्यात सरकार स्थापन झालेलं नाही. यासाठी महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठकांवर बैठका सुरु आहेत. पण अद्याप सरकारमधील मंत्रिपदाचा तोडगा निघालेला नाही. यातच मुख्यमंत्री पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? हे देखील स्पष्ट झालेलं नाही. यातच दुसरीकडे महाविकास आघाडीचा पराभव झाल्यानंतर आता आघाडीतील नेते कामाला लागले आहेत. तसेच पराभवाची कारणं आता नेत्यांकडून शोधण्यात येत आ-हेत.

या पार्श्वभूमीवरच आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या अपयशाबाबत चर्चा झाली. तसेच यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार रोहित पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांच्यावर मोठी जबाबदारी सोपण्यात आली आहे. यासंदर्भातील माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आज पक्ष कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे मुख्य प्रत-ोत म्हणून रोहित आर आर पाटील यांची निवड करण्यात आली. तसेच प्रतोत म्हणून उत्तम जानकर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या आमदारांची मुंबईत महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीला बीडचे आमदार संदीप क्षीरसागर उपस्थित नव्हते. त्यामुळे संदीप क्षीरसागर हे बैठकीला का उपस्थित नव्हते? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत. पण आमदार संदीप क्षीरसागर हे का उपस्थित नव्हते, याबाबत जयंत पाटील यांनी त्यांच्या मतदारसंघात काही नियोजित कार्यक्रम असल्याचं कारण सांगितलं.




### आंतरराष्ट्रीय समिती नेमण्याची केली मागणी

## पृथ्वीराज चव्हाणांचा ईव्हीएमवर संशय, निवडणूक आयोगावरही मोठा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरुन चकीत करणारे आकडे समोर आले आहेत. महाविकास आघाडीची सपाटून हार झाली आहे. अश-ातच यंदा राज्यभरातील मतटक्का वाढला आहे. महिलांनी यंदा भरभरुन मतदान केले आहे. तसेच सायंकाळी पाच वाजल्यानंतरही अनेक मतदानकेंद्रांवर रांगा लागल्या होत्या. यामुळे काँग्रेसकडून निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी निवडणूक आयोगाकडे वाढीव मतटक्क्याचे पुरावे मागितले आहेत. पटोलेंनंतर आता माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही ईव्हीएमविरोधात मास्टरस्ट्रोक टाकला आहे.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, ५ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठ्या जागा मिळाल्या होत्या. पण विधानसभेत इतका कल बदलेल अशी परिस्थिती दिसत नाही. महाविकास आघाडीसह जनतेला आत्मविश्वास होता की, यावेळी सत्ताबदल होणार. पण आश्चर्य वाटतं की, पक्षफुटीच्या विषयाचा निवडणुकीत काहीच फरक पडला नाही. देशात लोकशाही आहे. निवडणुक फ्री आणि फेअर होणे आवश्यक आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी पुढे ईव्हीएम वरुन निवडणूक आयोगाला धारेवर धरले. ते म्हणाले, पंतप्रधानानी निवडणूक आयुक्त बदलण्याचा निर्णय घेतला तेव्हाच आम्हाला अंदाज आला होता, काहीतरी गडबड आहे. द्वेष पसरवणारी भाषण मोदी योगी यांच्याकडून करण्यात आली आहेत, त्यांच्यावर आयोगाने कारवाई केली नाही. निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे कारवाई करणे. ईव्हीएम मशीनवर जनतेचा विश्वास राहिला नाही. पण आता फेर पडताळणीचा मला तरी वाटतंय काही फायदा होणार नाही.' यासोबतच चव्हाणांनी सर्वच्या सर्व ततझढच्या चिठ्या मोजायला हव्यात अशी मागणी देखील केली आहे. पृथ्वीराज चव्हाणांनी पुढे पुन्हा ईव्हीएम तपासणीच्या मुद्द्यांवर भर दिला. 'निवडणूक आयोगाने एतच् मशीन तपासणीसाठी दिल्या पाहिजेत. आंतरराष्ट्रीय समिती नेमून मशीनची तपासणी केली पाहिजे. ईव्हीएम मशीन हा-तात भेटले पाहिजे. त्या मशीनमध्ये काही गुप्त कोड आहे का? याचीही तपासणी व्हायला हवी. जागतिक तज्ज्ञांकडून त्याची तपासणी झाली पाहिजे. त्याशिवाय सत्य बाहेर येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. यासोबतच पृथ्वीराज चव्हाणांनी सत्ताधारी आणि निवडणूक आयोगावरही निशाणा साधला आहे. 'लोकशाहीचा यांनी मूडदा पाडला आहे,' असा घणाघाती आरोप चव्हाणांनी केला.

## संपादकीय....

### ईव्हीएमवर आरोप

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरुन चकीत करणारे आकडे समोर आले आहेत. महाविकास आघाडीची सपाटून हार झाली आहे. अशातच यंदा राज्यभरातील मतटक्का वाढला आहे. महिलांनी यंदा भरभरुन मतदान केले आहे. तसेच सायंकाळी पाच वाजल्यानंतरही अनेक मतदानकेंद्रांवर रांगा लागल्या होत्या. यामुळे काँग्रेसकडून निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी निवडणूक आयोगाकडे वाढीव मतटक्क्याचे पुरावे मागितले आहेत. पटोलेंनंतर आता माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही ईव्हीएमविरोधात मास्टरस्ट्रोक टाकला आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, ५ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठ्या जागा मिळाल्या होत्या. पण विधानसभेत इतका कल बदलेल अशी परिस्थिती दिसत नाही. महाविकास आघाडीसह जनतेला आत्मविश्वास होता की, यावेळी सत्ताबदल होणार. पण आश्चर्य वाटतं की, पक्षफुटीच्या विषयाचा निवडणुकीत काहीच फरक पडला नाही. देशात लोकशाही आहे. निवडणुक फ्री आणि फेअर होणे आवश्यक आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी पुढे ईव्हीएमवरुन निवडणूक आयोगाला धारेवर धरले. ते म्हणाले, पंतप्रधानानी निवडणूक आयुक्त बदलण्याचा निर्णय घेतला तेव्हाच आम्हाला अंदाज आला होता, काहीतरी गडबड आहे. द्वेष पसरवणारी भाषण मोदी योगी यांच्याकडून करण्यात आली आहेत, त्यांच्यावर आयोगाने कारवाई केली नाही. निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे कारवाई करणे. ईव्हीएम मशीनवर जनतेचा विश्वास राहिला नाही. पण आता फेर पडताळणीचा मला तरी वाटतंय काही फायदा होणार नाही.' यासोबतच चव्हाणांनी सर्वच्या सर्व व्हीव्हीपीटीच्या चिठ्या मोजायला हव्यात अशी मागणी देखील केली आहे. पृथ्वीराज चव्हाणांनी पुढे पुन्हा ईव्हीएम तपासणीच्या मुद्द्यांवर भर दिला. 'निवडणूक आयोगाने एतच् मशीन तपासणीसाठी दिल्या पाहिजेत. आंतरराष्ट्रीय समिती नेमून मशीनची तपासणी केली पाहिजे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वे प्रशासन, रेल्वे पोलिसांची खबरदारी गर्दीच्या नियोजनासाठी रेल्वेकडून अनेक उपाययोजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वे प्रशासन आणि रेल्वे पोलिसांकडून विशेष खबरदारीची पावले उचलली आहेत. मध्य आणि पश्चिम रेल्वेवर दररोज ७५ ते ८० लाख प्रवाशांचा प्रवास होतो. ६ डिसेंबरला मात्र दैनंदिन प्रवाशी संख्या ९० ते ९५ लाखापर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता गर्दीचे विभाजन करण्यासाठी अनेक मार्ग बंद केले आहेत. त्याऐवजी पर्यायी नवीन मार्ग खुले केले आहेत. तसेच मध्य रेल्वेच्या दादर स्थानकातून चैत्यभूमीकडे जाणारा मार्ग सूचित करण्यासाठी जागोजागी सूचना फलक लावण्यात आले आहेत.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमी येथे लाखोंच्या संख्येने अनुयायी येतात. यामधील बहुतांश अनुयायी लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांनी आणि लोकलने दादर गाठतात. परिणामी ५ आणि ६ डिसेंबर रोजी रेल्वेचे नियमित प्रवाशी तसेच दर्शनासाठी आलेले अनुयायी हे एकत्र आल्यामुळे स्थानक परिसरात अफाट गर्दी होईल. त्यामुळे रेल्वे पोलिसांसह आरपीएफ, गृहरक्षक, महाराष्ट्र सुरक्षा बल आणि इतर सुरक्षा व्यवस्थेचा फौजफाटा दादर स्थानकात तैनात केला आहे. सुरक्षेसह पादचारी पुलांचे नियोजन प्रशासनाकडून केले आहे.

दादर मध्य आणि पश्चिम रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यासाठी तसेच स्थानकाबाहेर पडण्यासाठी, मुख्यत्वे दादर मध्य रेल्वे स्थानक पूर्व-पश्चिम जोडणारा मध्य मोठा पादचारी पुल, उत्तर दिशेकडील स्कायवॉक पादचारी पूल, दक्षिण दिशेकडील महानगर पालिका पादचारी पुल, इतर पादचारी पुलाचा वापर करण्यात येतो. ५, ६ डिसेंबर रोजी दादर मध्य आणि पश्चिम रेल्वे स्थानकावर मोठया प्रमाणावर गर्दी होणार असल्याने रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे प्रवासी, अनुयायी त्याचबरोबर बाहेरुन रेल्वे स्थानकात येणारे प्रवासी, अनुयायी हे एकमेकांसमोर येऊन गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊन त्यातून चेंगराचेंगरी सारखी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ५ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते ६ डिसेंबर रात्री १२ वाजेपर्यंत पादचारी पुलांच्या वापराबाबत काही निर्बंध असतील.

दादर मध्य आणि पश्चिम रेल्वे स्थानकातील पूर्व-पश्चिम जोडणारा मध्य मोठा पूल व फलाट क्रमांक १२ वरील सर्व प्रवेशद्वार महापालिका हद्दीतून रेल्वे स्थानकात येणाऱ्या अनुयायी , प्रवाशांकरीता बंद राहील. हा पूल फक्त लोकल आणि रेल्वेगाड्यांनी येणाऱ्या प्रवाशांना पूर्व-पश्चिमेकडे महापालिका हद्दीत बाहेर जाण्याकरीता आणि दादर मध्य , पश्चिम रेल्वे स्थानकातील एका फलाटावरुन दुसऱ्या फलाटावर जाण्याकरीता खुला राहील.स्कायवॉक हा स्थानकाबाहेरील पूर्व-पश्चिम महानगरपालिका हद्दीतून येणाऱ्या अनुयायी आणि दैनंदिन रेल्वे प्रवाशांकरीता दादर रेल्वे स्थानकांवरील फलाटावर येण्याकरीता खुला राहील.

दादर मध्य आणि पश्चिम रेल्वे स्थानकात लोकल, रेल्वे / मेलगाड्यांनी येथून दादर येथे उतरणाऱ्या प्रवाशांना तसेच अनुयायी यांना पूर्व-पश्चिमेकडे महापालिका हद्दीत बाहेर जाण्यासाठी खुला राहील.महानगरपालिका पुलाबाहेरील पूर्व-पश्चिम महापालिका हद्दीतून दादर रेल्वे स्थानक येथे फलाटावर येणाऱ्या अनुयायी, दैनंदिन रेल्वे प्रवाशांकरीता खुला राहील.

दादर मध्य आणि पश्चिम रेल्वे स्थानकात लोकल, रेल्वेगाड्यांनी येऊन दादर येथे उतरणाऱ्या प्रवासी आणि अनुयायांसाठी पूर्व-पश्चिमेकडे महापालिका हद्दीत बाहेर जाण्यास बंद ठेवण्यात येईल.

मध्य मोठ्या पादचारी पुलाच्या उत्तरेकडील मध्य रेल्वेवरील पादचारी पूल हा दादर मध्य रेल्वे स्थानकातील फलाटावर उतरणाऱ्या प्रवाशांना फलाट बदलण्याकरीता आणि पूर्व बाजूस महानगरपालिका हद्दीत जाण्याकरीता खुला राहील.मध्य मोठ्या पुलाच्या उत्तरेकडील मध्य आणि पश्चिम स्थानकांना जोडणारा पादचारी पुल हा फक्त फलाटावरील प्रवाशांकरिता फलाट बदलण्याकरिता खुला राहील. तसेच पादचारी पुलावरून मध्य आणि पश्चिम रेल्वे स्थानकावरील रेल्वे प्रवाशी हे मध्य रेल्वेच्या हददीपासून स्कायवॉक पादचारी पुलाकडे वळविण्यात येतील.पश्चिम रेल्वेवरील दादर स्थानक फलाट क्रमांक १ वरील स्कायवॉकलगतचे गेट क्रमांक १,६ व ७ वगळता सर्व प्रवेशद्वार ही रेल्वे प्रवाशी आणि अनुयायी यांना शहर हद्दीतून फलाटावर येण्यास बंद राहतील.

पश्चिम रेल्वेवरील दादर स्थानक फलाट क्रमांक १ वरील पादचारी पूल महानगरपालिका हद्दीतून येणाऱ्या रेल्वे प्रवाशी आणि अनुयायी यांना पश्चिमेकडून पूर्वेकडे जाण्यास बंद राहील.पश्चिम रेल्वेच्या दादर स्थानक फलाट क्रमांक २/३, ४/५ वर उतरणाऱ्या प्रवाशांना या पुलावर येऊन स्कायवॉकमार्गे महानगरपालिका हद्दीत पूर्व आणि पश्चिम दिशेने जाता येईल. तसेच स्कायवॉकमार्गे प्रवाशांना मध्य रेल्वे स्थानक फलाट क्रमांक ९/१०, १०/११ व १२, १३/१४ वर प्रवेश करता येईल. तसेच या पुलावर दादर पश्चिम रेल्वे स्थानकाचे फलाट क्रमांक १ वरील जिन्यावरून व उद्वाहनाने येता येईल.

# मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांचा ब्राम्हण महासंघातर्फे सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे व्यवस्थापक तथा नायब तहसिलदार मनोज बाळकृष्ण श्रोत्री यांना अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ महाराष्ट्र प्रदेश, पिंपरी चिंचवड, शहर जिल्हा यांचे वतीने सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले आहे. १ डिसेंबर रोजी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे सचिन कुलकर्णी (पिं.चिं. शहराध्यक्ष), दिलीप कुलकर्णी (प्रदेश सरचिटणीस), महेश बारसावडे (पिं.चिं. कार्याध्यक्ष) यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या कार्यालयात उपस्थित राहून मनोज श्रोत्री यांचा सन्मानपत्र, श्रीफळ, शाल देऊन सत्कार करण्यात आला.




श्रोत्री यांनी आतापर्यंत तहसिल कार्यालय पंढरपूर, सांगोला, अक्कलकोट व उपविभागीय अधिकारी, पंढरपूर व मंगळवेढा इत्यादी ठिकाणी सेवा बजावली असून, त्यांना सुमारे २९ वर्षे महसूल सेवेचा अनुभव आहे. या सेवा कालावधीत आतापर्यंत केलेली उल्लेख कामे तसेच व्यवस्थापक म्हणून मंदिर समिती मार्फत कार्तिकी यात्रा २०२४ चे केलेले नियोजन व भाविकांना देण्यात येणा-या सोई सुविधांचा विचार करून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तर्फे सन्मान करण्यात आला आहे. श्रोत्री यांनी आतापर्यंत महसूल सहायक, अव्वल कारकून / मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार इत्यादी पदावर काम केले असून, प्रत्येक पदाची उंची वाढविली आहे. मानवी मनाला परमानंद देणारी गोष्ट म्हणजे यश ! आम्हास आपल्या कामगिरीचा सार्थ अभिमान वाटतो, आपण समाजा समोर एक उत्तम आदर्श ठेवलेला आहे. आपले कार्य सर्वांना प्रेरणादायी ठरो, भविष्यात आपणा कडून विधायक कार्य घडावे. त्यासाठी आपणास जनतेचे सहकार्य लाभावे व निरामय आरोग्य प्राप्त व्हावे अशाच प्रकारचे मान सन्मान मिळत राहो, आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा. आपल्या उत्तुंग कार्याबद्दल आपल्याला हे सन्मान पत्र देण्यात आले असल्याचे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेश सरचिटणीस दिलीप कुलकर्णी यांनी सांगीतले. अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाने केलेल्या सन्मनाने अधिक सकारात्मक सेवा करण्याची ऊर्जा मिळाली असून, ती ऊर्जा पुढील वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी केले.

# थकबाकीमुळे वीज कनेक्शन तोडलेल्या ग्राहकांसाठी अभय योजनेला मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना २०२४ ला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी केले.

राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू केली होती. योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपत असून सदर योजनेस एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. राज्यातील ६५,४४५ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून ८६ कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ४४ कोटी ३५ लाख रुपयांचे व्याज व विलंब आकार माफ झाला आहे. नागपूर परिमंडळातील ७५९२ वीज ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला असून हे परिमंडळ पहिल्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर परिमंडळ (६१०१ ग्राहक) आणि पुणे परिमंडळ (५८९३ ग्राहक) ही परिमंडळे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. विभागांमध्ये नागपूर विभाग २०,४०० लाभार्थी ग्राहकांसह पहिल्या क्रमांकावर आहे. त्या नंतर कोकण विभाग (१७,७९८), पुणे विभाग (१७,४४८) व छत्रपती संभाजीनगर (९८१८) यांचा क्रम लागतो.



सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रांचायजी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे. संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल पवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.

## पंचशील विद्यालय बाराभाटी येथे त्रिसमिती सभा

**मुख्याध्यापक व्ही.एम. चव्हाण**

# संपत्ती पेक्षा संतती अधिक महत्वाची

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोडगांव देवी : अर्जुनी मोरगांव तालुक्यातील पंचशील विद्यालय बाराभाटी येथे दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी पालक-शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समिती व सखी सावित्री समिती अशी त्रिसमिती बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्रथमतः प्रतिमेच्या स्वरूपात असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व विद्येची देवी माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



याप्रसंगी तिन्ही समितीचे उपस्थित पदाधिकारी शाळेचे मुख्याध्यापक व्ही.एम चव्हाण, जया चौरीकर, रत्नदीप मेश्राम, हेमलता खोब्रागडे, येरणे, बेलखोडे, जेष्ठ सहाय्यक शिक्षक डी.एच मेश्राम व इतर सदस्यांचे नाद मधुर अशा स्वागत गीताने तसेच पुष्पगुच्छ देऊन शाळेतील विद्यार्थिनी व शिक्षकांनी सन्मानपूर्वक स्वागत केले.

यानंतर तिन्ही समितीत अंतर्भूत असलेल्या विषयावर साधक-बाधक सविस्तर चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात आले. विद्यार्थी शिस्त व उपस्थिती यात सातत्य टिकून ठेवण्यासाठी वर्ग शिक्षकांबरोबर पालकांनी सहकार्य करणे आवश्यक असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा (झजउडज) याविषयी सविस्तर माहिती देत मुख्याध्यापकानी शाळेमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी सुरक्षिततेकरिता सीसीटीव्ही कॅमेरे, तक्रारपेटीची सुविधा केली असून शिस्त व सुरक्षिततेच्या बाबतीत शिक्षक नेहमी मार्गदर्शन करीत असल्याचे पालकांचे लक्षात आणून दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून शाळेमध्ये आवश्यक भौतिक सुविधेसोबत अनेक उपक्रम राबविले जातात तसेच शिक्षक आत्मीयतेने अध्यापन करतात. मात्र मूल्यमापन केले असता अपेक्षित निकाल मिळत नसून याला विद्यार्थ्यासोबत पालकही जबाबदार असल्याची खंत मुख्याध्यापकांनी मांडली. कारण अलीकडे प्रत्येक गावात व घराघरात मोबाईलच्या अतिवापरामुळे तसेच याकडे पालकांचं कळत नकळत होत असलेल्या दुर्लक्षितपणामुळे विद्यार्थी नियमित अभ्यास, व्यायाम व मैदानी खेळापासून मुकत चाललेला आहे. म्हणून पालकांनी या गोष्टीचं गांभीर्य लक्षात घेत विद्यार्थ्यांना आवश्यक तो शैक्षणिक साहित्य घेऊन देणे, दैनंदिन कामाबरोबर दररोज मुलांना वेळ देऊन अभ्यासाविषयी चौकशी करणे काळाची गरज आहे. कारण संपत्तीपेक्षा संतती अधिक महत्त्वाची असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. या सभेमध्ये पालकांचे हमीपत्र घेऊन एकदिवसीय शैक्षणिक सहल घेऊन जाणे तसेच हळदी कुंकूच्या कार्यक्रमासह महिला पालकांना प्रत्यक्ष कार्यक्रमात सहभाग करून दोन दिवशीय स्नेहसंमेलन आयोजित करण्याचे ठरवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रभावी अध्यापनासोबत नवोपक्रमात सातत्य ठेवावे असे निर्देश सर्व विषय शिक्षकांना मुख्याध्यापकांनी दिले. डिसेंबर महिन्यात आपल्या शाळेत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन तसेच योग प्रशिक्षण शिबिर होणार असल्याचे मुख्याध्यापकांनी सर्वांचे लक्षात आणून दिले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन शाळेतील सहाय्यक शिक्षक एन.एस नंदागवळी व आभार जे.एम दोनाडकर यांनी मानले.

# जनावरांच्या गोठ्याची स्वच्छता व निर्जंतुकीकरणावर प्रात्यक्षिकातून कृषिदूतांनी केले शेतकऱ्यांना मार्गदर्शन !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचालित आणि महात्मा फुले कृषी विदयापीठ राहुरी संलग्न डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग अंतर्गत जनावरांचा गोठा स्वच्छ कसा ठेवावा ? काय काळजी घ्यावी ? याचे प्रात्यक्षिक कृषिदुतांनी शेतकऱ्यांना करून दाखविले. हा कार्यक्रम इंदापूर तालुक्यातील भगतवाडी येथे पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांचे सहाय्य घेऊन व विविध अवजारे वापरून गोठ्याची स्वच्छता केली. खोऱ्याच्या साह्याने गाईचे शेण एका टोपलीमध्ये भरले. जमिनीवर पडलेल्या मलमूत्राची पाणी फवारणी यंत्राद्वारे स्वच्छता केली. यावेळी गोठ्यामध्ये असलेल्या गाईंची ही स्वच्छता करण्यात आली. यावेळी विविध औषधांचा वापर करण्यात आला.गोठ्यातील वातावरण जास्त वेळ ओलसर राहिल्यास, अशा ठिकाणी जिवाणू, विषाणू आणि परोपजीवींची वाढ मोठ्या प्रमाणात होत असते. परिणामी जनावरे आजारी पडण्याचे प्रमाण वाढते. हे सर्व टाळण्यासाठी गोठ्याचा परिसर स्वच्छ ठेवावा. अश्या सुचना यावेळी विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना दिल्या.

जनावरे सकाळी बाहेर सूर्यप्रकाशात बांधावीत. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावताना संपूर्ण गोठा व्यवस्थित स्वच्छ करून घ्यावा, असे केल्याने गोठ्यातील माशांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. गोठ्यात जनावरे बसण्याच्या जागेवरील सर्व खाचखळगे मुरूम टाकून व्यवस्थित भरून घ्यावेत. जनावरे बसण्यासाठी मॅटचा वापर करावा. गोठ्यातील अमोनिया बाहेर जाऊन हवा खेळती राहील, याकडे लक्ष द्यावे, असे मार्गदर्शन करण्यात आले.




गोठा स्वच्छतेचे प्रात्यक्षिक कृषिदुत प्रतिक थोरात, सुरज गुंजाळ, वैभव चौधरी, संकेत गव्हाणे, कृष्णा इळगार, अभिषेक ढोक, संम्यक वैद्य, सुजित शिंदे यांनी प्रात्यक्षिक सादर केले व शेतकऱ्यांना याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एस. पी. गायकवाड, प्रा.एस. व्ही. बुरुंगळे यांचे व इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### प्रवासादरम्यान महिलेचे गंठण लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : सैफुल ते मंद्रूप बस मध्ये प्रवासादरम्यान फिर्यादी रेणुका रमेश कोळी (वय-२३,रा. सोलापूर महानगरपालिका कॉटर्स,जुळे सोलापूर) यांनी पर्समध्ये ठेवलेले १ लाख ५ हजार रुपये किमतीचे बारा ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २९ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे अकरा ते पावणे दोनच्या दरम्यान सैफुल बस स्टॉप ते मंद्रूप दरम्यान घडली.याप्रकरणी रेणुका कोळी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे हे करीत आहेत.

### विवाहितेच्या छळ प्रकरणी पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी मिळून शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक त्रास देऊन छळ केल्याची फिर्याद निलोफर जुबेर कलबुर्गी (वय-४०,रा.बसवेश्वर नगर भाग २ नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती जुबेर कलबुर्गी, सासू शमी कलबुर्गी, दीर समीर अब्दुल, सादिक अब्दुल, जाऊ हिना जमीर, सलमा (सर्व.रा.शास्त्रीनगर,सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १५ डिसेंबर २००६ ते ३० ऑक्टोंबर २०२४ रोजी पर्यंतच्या दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिंदे हे करीत आहेत.

# माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी स्वगृही यावे

## सांगोला येथील चिंतन बैठकीनंतर नागरिकांमध्ये चर्चांना उधाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी पुन्हा स्वगृही म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परत ती यावे, यासाठी आता दीपक आबा प्रेमी कार्यकर्त्यांनीच आग्रह धरला असून महाविकास आघाडीचे उमेदवार असतानाही आघाडी मधील घटक पक्षांनी आपली फसवणूक केल्यामुळेच निवडणुकीत आपला पराभव झाल्याने आघाडीच्या शिवसेना उभा त्या पक्षात न थांबता



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा सक्रिय व्हावे अशी आग्रही मागणी जोर धरू लागल्याने आता, माजी आमदार दीपक आबा हे पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेवर जात असलेली चर्चा सर्वत्र ऐकवयास मिळत आहे

पराभवाची चिंतन करण्यासाठी सांगोला येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मतदारसंघातील हजारो कार्यकर्त्यांनी दीपक आबा साळुंखे पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून सक्रिय व्हावे, असा आग्रह धरला, या बैठकीत तानाजी काका पाटील, आर डी पवार, डॉक्टर पियुष साळुंखे पाटील, माजी नगरसेवक शिवाजी बनकर, शिवाजी कोळेकर, डॉक्टर राज मिसाळ, संभाजी हरहर, अजित देवकते नितीन रणदिवे विजय इंगोले भारत नागणे रफिक काजी प्राध्यापक आणि नवत्रे आधी सहप्रमुख कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना माजी आमदार दीपक आबा यांनी आपल्या फसवणाऱ्या महाविकास आघाडीतून बाहेर पडावे असा आग्रह धरला व या चिंतन बैठकीत दीपक आबांनी ही कार्यकर्त्यांच्या भावनांचा भूमिकेचा आदर करूनच पुढील राजकीय वाटचाल ठरवण्यात असल्याचे सांगितल्यामुळे दीपक आबा पुन्हा स्त्रोवरही परतणार असल्याचे या बैठकीतून संकेत मिळाले आहेत.

## देवराजभाऊ जाधव यांनी इंदापूर अर्बन बँकेच्या अध्यक्ष पदाचा दिला राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

घरगुती अडचणीमुळे बँकेचे कामकाज पाहणे शक्य नसल्याने राजीनामा देत आहे. तसेच आज पासून बँकेच्या कोणत्याही कामकाजामध्ये माझी कोणतीही जबाबदारी राहणार नाही असे राजीनामा पत्रामध्ये म्हटले आहे.

इंदापूर अर्बन बँकेवर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे वर्चस्व असून इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी गावचे देवराज जाधव हे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे अतिशय जवळचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जायचे.



परंतु नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये देवराज जाधव यांनी राष्ट्रवादी

### बँकेचे कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राजीनामा सुपूर्द

काँग्रेस पार्टी अजित पवार गटामध्ये जाहीर प्रवेश केला होता.

## हिंदूच्या घटत्या लोकसंख्येवर सरसंघचालक मोहन भागवत यांची चिंता

(पान १ वरून...) साधून आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन भागवत यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

'दोन किंवा तीन अपत्यांची संख्या समाज टिकण्यासाठी महत्त्वाची आहे. समाजाचे अस्तित्व राहिले पाहिजे अशी सर्वांची भूमिका असते, कारण ते आपले असते. ते किती चांगले किंवा वाईट याचे मूल्यांकन नंतर असते, पण आपले असल्याने ते टिकावे अशी सर्वांची इच्छा असते. यासाठी सर्वांनी दोन किंवा तीनपेक्षा कमी अपत्ये करू नये', असे मोहन भागवत यांनी सांगितले.

'अलीकडे जगभर अहंकार, कट्टरता यामुळे भांडणे होत आहेत. अशा परिस्थितीत आपल्या संस्कृतीचा प्रसार जगभर करणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृती जाती, भाषा किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नाही. आपल्याकडे मूल्यांना प्रथम स्थान दिले गेले आहे. आपल्याकडे व्यक्ती समाजातील प्रमुख घटक नसून कुटुंब आहे.

कुटुंब चालवण्यासाठी कुलनीती चालवणे आवश्यक आहे, कारण यातूनच संस्कृती टिकणार आहे', असेही भागवत म्हणाले. कार्यक्रमात संजय कठाळे आणि उदय कठाळे यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. आभार मधुश्री कठाळे यांनी मानले.

जातीपातीला शास्त्रात स्थान नाही. मात्र, कुटुंबात तशाप्रकारचे आचरण असल्यामुळे अद्यापही समाजात जातीभेद दिसून येतो.

मुळात हिंदू धर्म हे नाव नंतर आहे. सर्व मानवजातीच्या कल्याणाचा हेतू असलेला आपला मानव धर्म फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे, असे मत भागवत यांनी व्यक्त केले.

## आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांचा शिक्षक संघातर्फे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोटचे लोकप्रिय व पाणीदार आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांचा शिक्षक संघ अक्कलकोट तर्फे भव्य सत्कार जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड सर, तालूका अध्यक्ष श्री बसवराज खिलारी सर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जेष्ठ मार्गदर्शक श्री सुरेश शटगार सर, जिल्हा उपाध्यक्ष बाळकृष्ण मैत्री सर, उत्तर शिक्षक संघाचे अध्यक्ष अप्पाशा उमराणीकर सर, तालुका सोसायटीचे चेअरमन मंजुनाथ भातगुणकी सर, माजी चेअरमन काशिनाथ विजापूरे सर, ज्येष्ठ मार्गदर्शक बशीर बागवान सर, कन्नड जिल्हाध्यक्ष सिद्धाराम चौधरी




सर, उपाध्यक्ष श्री बसवराज दोडमणी सर, शिक्षक नेते योगेश बारस्कर सर, श्री गुरुनाथ नरुणे सर, बालाजी हादवे सर, तालुका सरचिटणीस शशिकांत रंगदाळ सर, कार्याध्यक्ष सतीश पाटील सर, कोषाध्यक्ष भिमशा चौगुले सर, उपाध्यक्ष व्यंकटेश धर्मसाले सर, मुख्याध्यापक वीरपाक्ष स्वामी सर, श्रीशैल दोडमणी सर, रमेश गोदे शिक्षक नेते बालाजी हदवे सर, प्रसिद्धीप्रमुख संगमेश्वर येळेगाव सर, सायबणणा गवंडी सर, पिरप्पा नंदाटे गणेश माळी, गजानन मीराशे, तालुका शिक्षक संघाचे पदाधिकारी व शिक्षक बांधव उपस्थित होते.

## रणजीत सिंह मोहिते पाटील यांची सावध भूमिका भाजपमधील स्थान पक्के करण्यासाठी हालचाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस मतदारसंघातील प्रवाह नंतर देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती माजी आमदार राम सातपुते हे आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांच्या विरोधात आक्रमक झाले आहेत त्यांची भारतीय जनता पक्षातून हॅटेल करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे दुसरीकडे रणजीत सिंह मोहिते पाटील यांनी पुन्हा भाजपमध्ये बिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. मोहिते पाटील यांनी थेट प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन महायुतीच्या विजयाबद्दल अभिनंदन केले आहे व माळशिरस विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाकडून सातपुते यांनी निवडणूक लढवली होती पण त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस चर्चेने पक्षाकडून उत्तम जानकर यांनी निवडणूक लढवली होती जानकर यांच्या पाठीची मोहिते पाटील यांचा बरोबर पाठिंबा होता.

त्यामुळे जानकर यांची राम सातपुते यांचा १३,१४७ मतांनी पराभव केला मोहिते पाटलाची मोठी ताकद विरोधात असूनही माळशिरस मध्ये सातपुते यांचा निसर्ता मतांनी पराभव झाला होता पराभवानंतर आमदार सातपुते मोहिते पाटील यांच्या विरोधात आक्रमक झाले आहेत आमदार रणजीत सिंह मोहिते



पाटील यांचे भाजपमधून छत्रपती करण्यात यावी, अशी मागणी सातपुते यांनी लावून धरले सातपुते यांच्या मार्गी नंतर सोलापूर ग्रामीण पश्चिम व्यवहाराचे जिल्हाध्यक्ष केदार सावंत यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मोहिते पाटील यांच्याकडे शिफारस केली आहे थोड्या दिवसाचे निकटवर्ती आमदार श्रीकांत भारतीय यांनीही रजनीच्या बाबत भाष्य केले आहे. भाजपचे नेते मंडळी विरोधात आक्रमक होत असताना रणजीत सिंह सावध केळी करत आहेत भाजपमधून अकडपट्टी मागणी होत असताना मोहिते पाटील यांनी थेट प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची भेट घेऊन विजयाबद्दल अभिनंदन केले आहे व भाजपमधील प्राण पक्की करण्यासाठी हालचाली त्यांनी सुरू केली असलेली भेटीवरून समजते.

## प्रा. नरेंद्र भोसले यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव पदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते व माढ्याचे लोकप्रिय खासदार मा. दहशिल भैया मोहिते पाटील यांच्या शिफारशी अनुसार प्रदेशाध्यक्ष मा पंडित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिवपदी निवड झाली.

दलित चळवती नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे उत्कृष्ट वक्ते, राजकीय विश्लेषक म्हणून ही ओळख त्यांची आहे, पॉलिटिकल सायन्स समाजशास्त्रीय भागातून ते एम ए बी एड झाले आहेत तसेच एम ए इतिहास मध्ये त्यांनी पदवी संपादन केले आहे सामाजिक राजकीय आंदोलनात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे लोकप्रिय खासदार धैरशील भैय्यासाहेब मोहिते पाटील यांच्या निकटवर्ती म्हणून मी त्यांची ओळख आहे.

त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी येणारा काळात राष्ट्रवादी काँग्रेस शहर चंद्रजी पवार पक्षांची सर्वे सभा शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचार घरोघरी पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणार आहे महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचा विकास साचिव नियोजित संकल्पना आणि त्यांनी जे सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी काम केले की वंचित समाज पर्यंत पोहोचवण्यात यासाठी प्रयत्न करणे असे मत मांडले आहे.



महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, मार्ग जयसिंह बाय दादा मोहिते पाटील, खासदार धैर्यशील भैय्यासाहेब मोहिते पाटील, प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे सोलापूर जिल्हा अध्यक्ष बळीराम काका साठे, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र भाऊ पाटील, व माढा तालुक्याचे आमदार अभिजीत (आबा) पाटील, मोहोळ चे आमदार राजू खरे, मा. अर्जुनसिंह मोहिते पाटील, मा. शेवटी शिव मोहिते पाटील, मा. प्रकाशराव पाटील, मदन बापू पाटील, प्रतापराव पाटील, अरुणजी तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे काम करून पक्षाची विचारधारा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणार आहे अपेक्षित समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करेन मत असे मत त्यांनी व्यक्त केले यावेळी मा अरुणजी तोडकर महासागर दादा यादव महा शिवाजी ठोकळे आदी उपस्थित होते.

### डुबेरे येथील जनता विद्यालयात प्रयोगशाळा साहित्य उद्घाटन

### उपाध्यक्ष अशोक पाटील यांचे प्रतिपादन

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी टीडीके कंपनी कटिबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्यासाठी चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देवून त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी टी. डी. के कंपनी कटिबद्ध आहे असे प्रतिपादन नाशिक येथील टीडीके कंपनीचे उपाध्यक्ष अशोक पाटील यांनी केले.

ते पुढे म्हणाले की आम्ही मविप्र संस्थेच्या दहा शाळांना प्रयोगशाळा साहित्य पुरविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा यामुळे शिक्षणातील दर्जा उंचावला जाईल तसेच यापुढे राहिलेल्या शाळांना जास्तीत जास्त मदत केली जाईल असे आश्वासन पाटील यांनी दिले.

मविप्र संस्था संचलित डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळा साहित्य उद्घाटन प्रसंगी श्री. पाटील बोलत होते.

मविप्र संस्था माजी विद्यार्थी संघटना व नाशिक येथील टी .डी. के इंडिया कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयोगशाळा साहित्याचे उद्घाटन मविप्र संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके व टीडीके कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट अशोक पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

व्यासपीठावर टी डी के कंपनीचे सी.एस.आर मॅनेजर नितीन देशमुख



,मविप्र संस्था माजी विद्यार्थी संघ संचालक डॉ.धनंजय चव्हाण,सदस्य प्रशांत निखाळे,शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने, पंचायत समितीचे माजी उपसभापती शंकरराव वामने, कारभारी वारूंगसे, विजय दादा वाजे , प्रवीण वामने, मुख्याध्यापक रामदास वाजे आदी उपस्थित होते. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी मविप्र संस्था कटिबंध आहे . ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्यासाठी चांगल्या सोयी- सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. प्रयोगशाळेला मिळालेले आधुनिक साहित्य कसे वापरायचे याचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात येणारा असून या संधीचा शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी उपयोग करून घ्यावा असे आव्हान मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके यांनी केले.

सहकार भारती नाशिक जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी नारायणशेठवाजे यांची निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने मविप्र संस्थेचे शिक्षणअधिकारी डॉ भास्करराव ढोके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शाळेला अत्याधुनिक प्रयोगशाळा साहित्य मिळवून देण्यासाठी उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर.करपे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी मानले यावेळी दिगंबर जाधव, सोमनाथ पगार , रेवननाथ कांगणे ,सोमनाथ गिरी, सुनील ससाणे, डी. ए. रबडे, सिद्धी आहेर आदींसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते .

# सर्व सामान्यांना त्रास देणाऱ्यांची गय केली जाणार नाही : आ. बाबासाहेब देशमुख

## आपले प्रेम, आशीर्वाद कायम राहू द्या : नवनिर्वाचित आ. बाबासाहेब देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा निवडणुकीतील कशाने आम्ही उडून जाणार नाही माझ्यासहित सर्व कार्यकर्त्यांची पदाधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली आहे.

तुमच्या पाठिंबा आणि विश्वास हीच माझी ताकद आहे. जनतेच्या भल्यासाठी काम करणे हेच माझे ध्येय असून, भविष्यातील मी तुमच्या सेवेसाठी तत्पर राहील, आपली प्रेमाने आशीर्वाद कायम राहू द्या असे आव्हान करत विधानसभा निवडणुकीतील ईशानी आम्ही होऊन जाणार नाही असे



मत सांगोल्याचे नूतन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूक मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. निवडणुकीनंतर जेवढे मताधिक्य जेवढे वृक्षारोपण लावण्याचा त्यांनी संकल्प केला असून शनिवारी मुंबईहून त्यांचे सांगोला येथे आगमन झाले त्यावेळी सर्वसामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती सर्वसामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती सर्वसामान्य नागरिक कार्यकर्त्यांनी हार पुढे ऐवजी रोपे घेऊन डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांचे अभिनंदन करत यावेळी बोलत होते आगामी काळात सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी नियमित कठिबद्ध असेल अशी ग्वाही उपस्थित त्यांना त्यांनी दिली.

**या पुढील काळात सांगोला तालुक्यात हुकूमशाही, दादागिरी गुंडगिरी, भाईगिरी, अजिबात चालू देणार नाही. सर्वसामान्य नागरिक विश्वासात घेऊन ५५ वर्षाचा परंपरा सांगोला मतदार संघात कारभार करू, कोणाचीही आडवणूक अथवा वेठीस धरण्याचे प्रकार आता चालणार नाही सर्व सामान्यांना त्रास देणाऱ्या कोणाची गय केली जाणार नाही. असा खणखणीत इशारा नूतन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी दिला.**

आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख म्हणाले की सांगोल्याच्या सर्वांगीण जनतेसमोर मी नतमस्तक होत असून विजय आमची जबाबदारी वाढवणार आहे. स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्याप्रमाणे माझ्यावर सांगून येतील सर्वसामान्य जनतेने मोठा विश्वास दाखवलेला आहे त्यामुळे आम्हाला मतदार संघात खूप काम करावे लागेल, याची जाणीव होत आहे जनतेने दाखवलेला विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. तालुक्यातील तालुक्याच्या प्रथम नागरिक म्हणून आता जबाबदारी वाढली आहे. विधानसभा निवडणुकीतील ईशान्य आम्ही पळून जाणार नाही सर्वच गावांमध्ये शेतकरी कामगार पक्षाला चांगले यश मिळाले माझ्यासहित सर्व कार्यकर्त्यांची पदाधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली असून आम्हाला इथून पुढे अधिक बारकाईने काम करावे लागेल आम्ही जनतेच्या ऋणात राहो इच्छितो. यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही नसल्याचेही त्यांनी सांगितले.

---

## थोडक्यात...

### अहिल्यादेवी होळकर विद्यापीठासमोर अपघात ; टँकर चालकावर गुन्हा

सोलापूर : अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या समोर अपघात प्रकरणी टँकर क्रं.एमएच.१३.सीयु.९२२२ यातील अज्ञात चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना ३० नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सुहास सज्जन शिंदे (वय-३३,मु.पो.कसबा सांगाव,ता. कागल,जिल्हा कोल्हापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून वरील टँकर क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे कोल्हापूर आगार येथून एसटी बस क्रमांक एमएच.१३.सीयु.७५३५ मध्ये प्रवासी घेऊन सोलापूर येथे वरील ठिकाणी आले असता, रस्त्यावर वाहने थांबली असल्याने फिर्यादी यांनी त्यांच्या ताब्यातील एसटी थांबवली.तसेच त्यांच्या मागे असलेला कंटेनर क्रमांक एमएच.०२. क्यू.जी.४९६३ हा थांबला होता.त्या कंटेनरला वरील क्रमांकाच्या अज्ञात वाहनाने निष्काळजीपणाने व अतिवेगाने वाहन चालून कंटेनरला मागून धडक देऊन कंटेनरच्या समोरील व मागील बाजूस नुकसान होण्यास व तसेच एस टी बसची काच फुटून ३५ हजार रुपयांचे नुकसान होण्यास कारणीभूत झाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कसबे हे करीत आहेत.

---

### डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

६ डिसेंबर दिनी क्रांतीसुर्य लोपला
महामानवाच्या आठवणीत कंठ दाटला
वंदन करण्यासाठी चैत्यभूमीवरी
लाखोंच्या संख्येने जनसागर लोटला

बाबा तुम्हाला वाहलेले
हार अन् फुले सुकून जातील
तुमचे विचार मात्र प्रत्येकाच्या मनात
सुगंधापरी दरवळत राहतील

झिजवलीत काया चंदनापरी
दीनदुबाळ्यांसाठी दिली मायेची सावली
अंधाऱ्या जीवनातून काढून बाहेर
ज्ञानरूपी प्रकाशाची वाट दावली

क्रांती नवी घडविण्यासाठी
सारे एकजूट होऊन घेऊया शपथ
डॉ.बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी
पुढे नेऊ मिळून त्यांच्या कार्याचा रथ

आमच्या आयुष्याचं केलं सोनं
देहाचे झिजून केले चंदन
ज्ञानाच्या महासागराला
अंत:करणातून कोटी, कोटी वंदन !!

कवी – मिलिंद सुरेश जाधव
रा. पडघा, भिवंडी
मो . ८६५५५६९४३६

---

## दुधनी येथे संविधान दिनदिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेचे वाचन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनीधी : तालुक्यातील दुधनी येथे संविधान दिन उत्सव संविधान प्रास्ताविकेचे वाचन करुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात ही कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान प्रति चे पूजन प्रगतीशील शेतकरी श्री शंकर भांजे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संविधान समर्पण दिनाच्या महत्वा बद्दल रिपाइंचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्प झळकी,युवा नेता समाजसेवक सचिन लोड्डे,निंगप्पा निंबाळ, शिवापुत्र गायकवाड आदीने मनोगत व्यक्त करतांना त्याचे महत्व व गरजे बद्दल यावेळी सांगीतले आहे.या प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित असलेल्या शंकर भांजे, बाबा टक्कळकी यांचा सत्कार युवक मंडळाच्या वतीने वतीने यावेळी करण्यात आली.

या कार्यक्रमात प्रगतीशील शेतकरी श्री शंकर भांजे, श्री बाबा टक्कळकी, रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष श्री.सैदप्पा झळकी, शहर अध्यक्ष गोराखनाथ धोडमनी, निंगप्पा निंबाळ, संतोष जन्ना, गुरु दोडमनी, बसपाचे सुरेश झळकी, बसू जन्ना, सतलिंग निंबाळ, शिवपुत्र गायकवाड, धर्मा शिंगे, खाजप्पा शिंगे, महेंद्र लोडेन, सैदप्पा झळकी, गुरु गायकवाड, अंबु राठोड, लक्ष्मीपुत्र रेऊर, अर्जुन झळकी, पिंटू लोड्डन, गौतम झळकी, कल्याणराव झळकी, मुख्याद्यापक मल्लप्पा कांबळे सर, सतिश लोड्डे, सुरेश शिंगे, उदय मगी, खाजप्पा लोड्डे, शिवलिंग लोड्डे,लक्ष्मीपुत्र मगी, जयभीम बळूंडगी महेश मगी शांति जन्ना, भीमा झळकी, महेश बसवनकेरी सह भिमनगर येथील युव भीम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



---



## पुढील लोकसभा निवडणूक केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी ईशान्य मुंबईतून लढावी


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनीधी : घाटकोपर पूर्व येथील कामराज नगर मधील संघाराम बुद्धविहाराचे आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

स्थानिक आमदार पराग शहा यांच्या आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या या बुद्ध विहार लोकार्पण सोहळ्यात ना.रामदास आठवले यांच्या हस्ते पूज्य भिक्खु संघाला कठीण चिवरदान करण्यात आले.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे गौतम सोनवणे, स्थानिक समाज सेवक परमेश्वर कदम , बाळू सोनवणे, अनिल घायवट , रवी नेटवटे आदी मान्यवर उपस्थित होते. ईशान्य मुंबईतून जर केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी लोकसभा निवडणूक लढवली असती तर ते बहुमताने निवडून आले असते. पुढील लोकसभा निवडणूक ना.रामदास आठवले यांनी ईशान्य मुंबईतून लढवावी ते निश्चित बहुमताने निवडून येतील अशी आमची जाहीर मागणी असल्याचे माजी नगरसेवक परमेश्वर कदम यांनी म्हंटले.

---




---

**७६ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन**

## बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात ७६ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेचे उद्घाटन करताना राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे फिल्ड इन्व्हेस्टिगेटर एड. राजू बागूल म्हणाले की, बुद्धिझम हा प्रकाश दाखविणारा उच्चतम मार्ग आहे ज्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो करिता नागरिकांनी आपल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे. विहारात जाऊन पंचशील त्रिशरण ग्रहण करीत असताना संकल्पनात्मक विचारधारा समजून घेतली पाहिजे. बुद्धाच्या मानवतावादी दृष्टिकोनाला समाजात रुजविण्याची आवश्यकता आहे. बाबासाहेब उघडे डोळे असलेल्या बुद्ध मूर्तीची पूजा करायचे. म्हणून एस. बी. मुजुमदार यांनी पुण्यात तशी मूर्ती बसविली आहे. न्यायालयातील न्याय देवतेच्या डोळ्यावरील पट्टी सुद्धा काढून टाकण्यात आली आहे.

याप्रसंगी प्रा. विनोद बनसोडे म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाचे पालन करून दर रविवारी बुद्ध विहारात गेलेच पाहिजे. सम्यक रामटेके म्हणाले की, विचारांची देवाणघेवाण करताना इतरांना समजून घेणे आवश्यक आहे. टी. एन. थोरात म्हणाले की, आपल्या समाजात उच्च शिक्षित माणसे असली तरी एकत्रित येत नसल्याने ते शिक्षण निरुपयोगी ठरत आहे. किशोर हिरामण पाटील म्हणाले की, मला बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक साहित्य माहीत पडल्याने जीवनमान उंचावले आहे. आपण समता स्थापित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत ज्याची समाजाला गरज आहे.

प्रमुख वक्ते संघदीप रोडगे म्हणाले की, बौद्धांनी बुद्ध विहारात जाऊन सर्वांनी विद्वान भिक्खूचे प्रवचन ऐकले पाहिजे. मात्र सध्या बुद्ध विहारात वृद्धांची संख्या बघता ती वृद्ध विहारे होत चालली आहेत असे जाणवते. ज्या आईवडिलांना आपल्या मुलांना विहारात न्यायला कमीपणा वाटतो त्यांना बुद्ध कसे म्हणावे? जो प्रज्ञावंत आहे तो बुद्ध होय.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दक्षिण भारतातील द्रविड व उत्तर भारतातील नाग लोक हे नागवंशीय लोक आहेत. म्हणून त्यांना संघटीत करण्यासाठी आम्ही दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) हे राष्ट्रीय संघटन चालवीत आहोत. विहारात वक्ते, स्पर्धक, वादविवादपटू निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यशाळेचे आयोजन केले पाहिजे, ज्यातून नवीन पिढी घडेल. २४ नोव्हेंबर १९५६ ला काशी विद्यापीठात मार्गदर्शन करताना 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्याच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्म सत्य आहे तर मग पंचज्ञानेंदियाद्वारे मिळालेले व विज्ञानाने शोधलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न विचारून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारून सत्याकडे वळण्याचा संदेश आपणास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आज रोजी दिवसभर सभा, संमेलन, बैठकीत मार्गदर्शन केले होते. त्यात २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे असा आदेशयुक्त संदेश दिला होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावलावर पाऊल ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलने आज रोजी सकाळ, दुपार व संध्याकाळी अशा तीन सत्रात शहरातील सिडको, हडको व साकेत नगरात कार्यशाळांचे आयोजन केले आहे. योग्य व सक्षम माणसे विहाराच्या व्यवस्थापनात आली तर कब्जेधारी लोकांच्या ताब्यातून विहारे मुक्त होतील. परिणामी विहारे ही चळवळीची संस्कार केंद्रे होतील. करिता या विषयावर सातत्याने विविध विहारात चिकित्सात्मक कार्यक्रम होण्याची आवश्यकता आहे. ज्यातून बौद्धांचे ऐक्य घडून आल्यास समाज बुद्धांच्या मानवतावादाकडे वळेल. केवळ पुजा पाठ करून चालणार नाही तर बुद्ध समजून घेण्यासाठी आपण दर रविवारी बुद्ध विहारात गेलेच पाहिजे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, प्रा. विनोद बनसोडे, सम्यक रामटेके, तुकाराम थोरात, उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, एड. राजू बागूल संघदीप रोडगे इत्यादी उपासक उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.